# येशू ख्रिस्ताचे अनुसरण करण्यासाठी समर्पणाची प्रार्थना

मी एका देवावर विश्वास ठेवतो, जो निर्माता, सर्वशक्तिमान पिता आहे.

मी इतर सर्व तथाकथित 'देवतांचा' त्याग करतो.

मी कबूल करतो की मी देवाविरुद्ध आणि इतर लोकांविरुद्ध पाप केले आहे. यात मी देवाची आज्ञा मोडली आणि त्याच्याविरुद्ध आणि त्याच्या नियमांविरुद्ध बंड केले.

मी माझ्या पापांपासून स्वतःला वाचवू शकत नाही.

मी विश्वास करतो की येशू हा ख्रिस्त आहे, देवाचा पुनरुत्थित पुत्र आहे. तो माझ्याऐवजी मरण पावला आणि माझ्या पापांची शिक्षा त्याने स्वतःवर घेतली. तो माझ्यासाठी मेलेल्यांतून उठविला गेला.

मी माझ्या पापांकडे पाठ फिरवितो.

मी ख्रिस्ताच्या क्षमेची देणगी मागतो, जी वधस्तंभावर प्राप्त करण्यात आली.

मी आता ही क्षमेची देणगी स्वीकार करतो.

मी देवाला माझा पिता म्हणून स्वीकारण्याची निवड करतो, आणि त्याचे बनण्याची इच्छा धरतो.

मी सार्वकालिक जीवनाची देणगी शोधतो.

मी माझ्या जीवनाचे हक्क ख्रिस्ताकडे सोपवितो आणि त्याला आमंत्रित करतो की त्याने आजपासून माझ्या जीवनाचा प्रभु म्हणून राज्य करावे.

मी इतर सर्व आत्मिक निष्ठा सोडतो. मी विशेषतः **शहादा** आणि माझ्यावरील सर्व दावे सोडून देतो.

मी सैतानाचा आणि सर्व वाईटांचा नाकार करतो. मी दुरात्म्यांबरोबर केलेले सर्व करार किंवा वाईटाचे सिद्धांत मोडतो.

ज्यांनी माझ्यावर अधार्मिक सत्ता गाजविली आहे त्या सर्वांशी मी सर्व अधार्मिक नात्यांचा त्याग करतो.

ज्यांचा माझ्यावर कोणत्याही प्रकारे प्रभाव पडला आहे असे माझ्या पूर्वजांनी माझ्या वतीने केलेले सर्व अधार्मिक करार मी मोडून काढतो.

येशू ख्रिस्ताद्वारे देवाकडून येत नसलेल्या सर्व मानसिक किंवा आत्मिक क्षमतांचा मी त्याग करतो.

मी वचन दिलेल्या पवित्र आत्म्याच्या देणगीसाठी विनंती करतो.

हे परमेश्वर पित्या, कृपा करून मला स्वतंत्र कर आणि माझ्यात बदल घडवून आण म्हणजे मी तुला आणि केवल तुला गौरव देऊ शकेन.

माझ्यामध्ये पवित्र आत्म्याचे फळ उत्पन्न कर म्हणजे मी तुझा आदर करू शकेन आणि इतरांवर प्रेम करू शकेन.

मी मानवी साक्षीदारांसमोर आणि सर्व आत्मिक अधिकाऱ्यांसमोर हे जाहीर करतो की मी येशू ख्रिस्ताद्वारे स्वतःला परमेश्वरासमोर समर्पित करतो आणि त्याच्याशी स्वतःला बांधून घेतो.

मी जाहीर करतो की मी स्वर्गाचा नागरिक आहे. देव माझा रक्षक आहे. पवित्र आत्म्याच्या मदतीने मी प्रभु ख्रिस्ताच्या अधीन होण्याची निवड करतो आणि माझ्या सर्व दिवसांचा प्रभु म्हणून त्याचे आणि केवळ त्याचे अनुसरण करण्याची निवड करतो.